वाचा :-१. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन, महसूल व वने, मंत्रालय यांचे कडील पत्र दिनांक ५ फेब्रुवारी२०२०

३. भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे कडील पत्र क्रमांक १३७/२०१८/ FTS१०५४८ दिनांक ४ फेब्रुवारी, २०२०.

4. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र./मह-3/नै.आ./कावी/376/2020, दि.11/03/2020

---

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा**
**क्र.नैआ/कावि/ 607 /२०२०**
**दिनांक :- /०३/२०२०**

## आदेश

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 4 नुसार मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांनी पुणे विभागात कोरोना व्हायरस ( कोवीड-19) चे रुग्ण आढळून आले असून, हा व्हायरस तीव्र संसर्गजन्य स्वरुपाचा असलेने तातडीने खबरदारीच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यावश्यक झाले आहे. त्यासाठी कोवीड – 19 ची लक्षण आढळलेल्या संशयित रुग्णांना Qurantine ठिकाणी व त्यापैकी तपासणी अंती ज्या रुग्णांमध्ये कोवीड – 19 ची लागण झाली आहे. त्यांना तातडीने Isolation ठिकाणी ठेऊन आवश्यक त्या वैदयकीय सुविधा पुरविणेच्या आहेत. सबब पुणे विभागातील कोवीड – 19 च्याप्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सातारा जिल्हयातील उपजिल्हाधिकारी , तहसिलदार इतर अधिकारी व कर्मचारी तसेच इतर सर्व विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांना नियुक्तीच्या मुख्यालयात हजर राहणेच्या व कोणत्याही परिस्थितीत सुटटीच्या दिवशीही मुख्यालय न सोडण्याचे निर्देश मा. विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिलेले आहेत.

त्याअर्थी,मी, शेखर सिंह, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सातारा केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनयम 2005 अन्वये सातारा जिल्हयातील कोवीड – 19 च्या प्रादुर्भावाचे पार्श्वभूमीवर शासन / प्रशासन टाकील ती जबाबदारीचे कामकाज पार पाडण्यासाठी जिल्हयातील महसूल, आरोग्य, पोलीस , नगरपालिका / नगरपरिषदा व जिल्हापरिषद विभागातील अधिकारी / कर्मचारी यांनी आपले नियुक्तीच्या ठिकाणी मुख्यालयात हजर रहावे, तसेच कोणत्याही परिस्थितीत सुटटीच्या दिवशीही मुख्यालयात उपस्थित राहावे.तसेच सदर विभागातील अधिकारी / कर्मचारी यांनी मा.जिल्हाधिकारी यांचे पूर्वपरवानगी शिवाय रजेवर जाणार नाही अगर मुख्यालय सोडणार नाही . सदर बाबतीत काही हालगर्जीपणा झाल्यास केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 56 अन्वये कार्यवाहील पात्र राहील याची नोंद घ्यावी.

**(शेखर सिंह)**
**जिल्हाधिकारी सातारा तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा**

**प्रति,**

**1.विभाग प्रमुख, सर्व ---------------------------**

**2. उपविभागीय अधिकारी, -------------------------**

**4. तहसिलदार, ------------------**

**5. शाखा अधिकारी, --------------------------**

**प्रत - 1. मा.विभागीय आयुक्तसो, पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.**

Scanned by CamScanner